क्र. १२८ पहिले वर्ष

१२ फेब्रुवारी २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील सहावा रविवार

### प्रस्तावना

माणसाला पापापासून दूर ठेवण्यास व नीतिमान जीवन जगण्यास आधार मिळावा म्हणून परमेश्वराने आपणास आज्ञा दिल्या आहेत. ह्या आज्ञांचे आपण मनोमन पालन करून माणसाने आपले जीवन सन्मार्गाने जगावे म्हणून ह्या आज्ञांचे दान आपणास मिळाले आहे. ख्रिस्ती धर्माचा तो अमूल्य ठेवा आहे. हा ठेवा जपत असताना त्यांचे पालन आपल्याकडून होण्यास आपण जागृत राहिले पाहिजे व स्वत:च्या आचरणाने ख्रिस्ती जीवनाचा आदर्श घालण्यास परमेश्वराची कृपा आपणास मिळावी म्हणून ह्या मिस्साबलीमध्ये विशेष प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे परमेश्वरा, आमच्या स्वर्गीय पित्या, न्यायाने व सत्याने चालणाऱ्या लोकांना तू तुझ्या सहवासाचे अभिवचन दिले आहेस. तुझ्या सहवासात राहण्यासाठी आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभू शब्दविधी**

### पहिले वाचन

**बेनसिराक या पुस्तकातून घेतलेले वाचन १५:१५-२०**

**''त्याने कोणालाही अधार्मिक होण्याची आज्ञा केली नाही.''**

तुमची इच्छा असेल तर तुम्ही आज्ञापालन कराल आणि विश्वासूपणाने वागणे हा सर्वस्वी तुमचा निर्णय राहील. त्याने तुमच्यासमोर विस्तव आणि पाणी ठेवले आहे; तेव्हा हात पुढे करून तुम्ही दोहोंपैकी काहीही निवडू शकता. माणसांसमोर जीवन आणि मरण उभे असते आणि तो जे निवडील ते त्याला दिले जाईल. कारण देवाचे ज्ञान महान आहे; तो बलवान आहे आणि तो सर्व काही पाहतो. त्याचे डोळे, जे त्याला भितात त्यांच्याकडे लागलेले असतात आणि त्याला माणसांची सर्व कृत्ये माहीत आहेत. त्याने कोणालाही अधार्मिक होण्याची आज्ञा केली नाही, तसेच त्याने कोणालाही पाप करण्यास परवानगी दिली नाही.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### प्रतिसाद स्तोत्र

**११८:१-२, ४-५, १७-१८, ३३-३४**

प्रतिसाद : **''जे परमेश्वराच्या नियमशास्त्राप्रमाणे चालतात ते धन्य!''**

१. जे आपले वर्तन चोख ठेवून
परमेश्वराच्या नियमशास्त्राप्रमाणे चालतात ते धन्य!
जे त्याचे निर्बंध पाळून
अगदी मनापासून त्याचा शोध करतात ते धन्य!

२. तुझे आदेश आम्ही मन:पूर्वक पाळावे म्हणून तू ते आम्हाला लावून दिले आहेत.
तुझे नियम पाळण्यासाठी माझी वागणूक
व्यवस्थित असावी हेच माझे मागणे आहे.

३. आपल्या दासाला औदार्य दाखव,
म्हणजे मी जिवंत राहून तुझे वचन पाळीन.
तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्‌भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील.

४. हे परमेश्वरा, तू आपल्या नियमांचा मार्ग मला दाखव, म्हणजे तो मी शेवटपर्यंत धरून राहीन. मला बुध्दी दे, म्हणजे मी तुझे नियमशास्त्र पाळीन; खरोखर अगदी मनापासून ते मी पाळीन.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन २:६-१०**

**''गुप्त ठेवलेले ज्ञान देवाने युगांच्या पूर्वी तुमच्याआमच्या गौरवाकरिता नेमले होते.''**

जे पोक्त आहेत त्यांना आम्ही ज्ञान सांगतो, पण ते ज्ञान ह्या युगाचे नव्हे आणि ह्या युगाचे नाहीसे होणारे जे अधिकारी त्यांचेही नव्हे. तर देवाचे गूढ ज्ञान आम्ही सांगतो; ते गुप्त ठेवलेले होते, ते ह्या युगाच्या पूर्वी तुमच्याआमच्या गौरवाकरिता नेमले होते. ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यांतील कोणालाही कळले असते, कारण त्यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला क्रूसावर खिळले नसते, हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे :

''डोळ्याने जे पाहिले नाही,
कानाने जे ऐकले नाही
आणि माणसाच्या मनात जे आले नाही,
ते आपणावर प्रीती करण्यासाठी
देवाने सिध्द केले आहे.''

देवाने ते आत्म्याच्याद्वारे आपल्याला प्रगट केले. कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा आणि देवाच्या गहन गोष्टीचाही शोध घेतो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ६:५१**

**आलेलुया, आलेलुया!**
प्रभू म्हणतो, स्वर्गातून उतरलेली जिवंत
भाकर मीच आहे.
ह्या भाकरीतून जो कोणी खाईल तो
सर्वकाळ जगेल.
**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**५:१७-३७**

**''प्राचीन लोकांस मी जे सांगितले होते, ते तुम्ही ऐकले आहे; परंतु मी तुम्हांस सांगतो.''**

(येशू आपल्या शिष्यांस म्हणाला)

''नियमशास्त्र किंवा संदेष्ट्यांचे ग्रंथ रद्द करावयास मी आलो आहे असे समजू नका; मी रद्द करावयास नव्हे तर पूर्ण करावयास आलो आहे. कारण मी तुम्हांस खचित सांगतो, आकाश आणि पृथ्वी ही नाहीशी होईपर्यंत सर्व काही पूर्ण झाल्याशिवाय नियमशास्त्रातील एकही काना आणि मात्रा रद्द होणार नाही. ह्यास्तव जो कोणी ह्या लहान आज्ञांतील एखादी रद्द करील आणि त्याप्रमाणे लोकांना शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यात अगदी लहान म्हणतील, पण जो कोणी त्या पाळील आणि शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यात मोठा म्हणतील. कारण (मी तुम्हांला सांगतो, शास्त्री आणि परुशी ह्यांच्यापेक्षा तुमचे नीतिमत्त्व अधिक झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही.

''खून करू नको आणि जो कोणी खून करील तो न्यायसभेच्या दंडास पात्र होईल.'' असे प्राचीन लोकांना सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांस सांगतो, जो कोणी आपल्या भावावर (उगाच) रागावेल तो न्यायसभेच्या शिक्षेस पात्र होईल.) जो कोणी आपल्या भावाला, 'अरे

वेडगळा,' असे म्हणेल तो वरिष्ठ सभेच्या शिक्षेस पात्र होईल आणि जो कोणी त्याला ''अरे मूर्खा'' असे म्हणेल, तो नरकाग्नीच्या शिक्षेस पात्र होईल.) ह्यास्तव तू आपले दान अर्पण करण्यास वेदीजवळ आणीत असता आपल्या भावाच्या मनात आपल्याविरुध्द काही आहे असे तेथे तुला स्मरण झाले, तर तेथेच वेदीपुढे आपले दान तसेच ठेव आणि निघून जा. प्रथम आपल्या भावाबरोबर समेट कर, मग येऊन आपले दान अर्पण कर. वाटेवर तुझा वादी तुझ्याबरोबर आहे तोच त्याच्याशी सलोखा कर. नाहीतर कदाचित वादी तुला न्यायाधीशाच्या हाती देईल. न्यायाधीश तुला शिपायांच्या हाती देईल आणि तू तुरुंगात पडशील. मी तुला खचित सांगतो दमडीन् दमडी फेडीपर्यंत तू त्याच्यातून सुटणारच नाहीस.

('व्यभिचार करू नको' म्हणून सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, जो कोणी एखाद्या स्त्रीकडे कामेच्छेने पाहतो त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे.) तुझा उजवा डोळा तुला पापास प्रवृत्त करत असेल तर तो उपटून टाकून दे, कारण तुझे संपूर्ण शरीर नरकात टाकले जावे ह्यापेक्षा तुझ्या एक अवयवाचा नाश व्हावा हे तुझ्या हिताचे आहे. तुझा उजवा हात तुला पापास प्रवृत्त करीत असेल तर तो तोडून टाकून दे, कारण तुझे संपूर्ण शरीर नरकात पडावे, ह्यापेक्षा तुझ्या एका अवयवाचा नाश व्हावा हे तुझ्या हिताचे आहे.

''कोणी आपली बायको टाकली तर त्याने तिला सूटपत्र द्यावे हे सांगितले होते. मी तर तुम्हांस सांगतो की, जो कोणी आपली बायको व्यभिचाराच्या कारणावाचून टाकतो, तो तिला व्यभिचारिणी करतो आणि जो कोणी अशा टाकलेल्या बायकोबरोबर लग्न करतो तो व्यभिचार करतो.''

('खोटी शपथ वाहू नको तर आपल्या शपथा परमेश्वरापुढे खऱ्या कर' म्हणून प्राचीन काळच्या लोकांना सांगितले होते, हेही तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांस सांगतो, शपथ वाहू नका;) स्वर्गाची शपथ वाहू नका, कारण ते देवाचे राजासन आहे; पृथ्वीचीही वाहू नका, कारण ती त्याचे देवाचे पादासन आहे; यरुशलेमचीही नका, कारण ते थोर राजाचे नगर आहे. आपल्या मस्तकाची शपथ वाहू नको कारण तू आपला एकही केस पांढरा किंवा काळा करू शकत नाहीस. (तर तुमचे बोलणे, 'होय तर होय,' 'नाही तर नाही,' एवढेच असावे, ह्याहून जे अधिक ते वाईटापासून आहे.)

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद : प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप, बिशप, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूच्या धन्योद्गारांचा खरा अर्थ भाविकांना समजून देण्यास पवित्र आत्म्याचे साहाय्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. सर्व राष्ट्र प्रमुखांनी जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी, मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी तसेच जगातील साधन सामुग्री सर्वात योग्य तऱ्हेने विभागली जाण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू दीन, भुकेले व शोक करणारे यांचा धन्य म्हणून गौरव करतो. अशा ह्या धन्य लोकांत आपल्याला ख्रिस्त शोधता यावा व त्यांची सेवा करता यावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्याला पापापासून दूर ठेवण्यास व चांगले नीतिमान जीवन जगण्यास आधार मिळावा म्हणून परमेश्वराने आपल्याला आज्ञा दिल्या आहेत. ह्या आज्ञांचे मनोमन पालन करून आपल्याला सन्मार्गाने जीवन जगता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या/आज विवाहबध्द होणाऱ्या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू :** दयाळू पित्या, आमच्या प्रार्थना ऐक. तुझ्या दिव्य शब्दाद्वारे आमची पुनर्निर्मिती कर म्हणजे तुझ्या शब्दावर विश्वास ठेऊन सार्वकालिक जीवन उपभोगण्यास आम्ही पात्र ठरू, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या दिव्य शब्दाच्या आदेशाला अनुसरून आम्ही हे दान तुला अर्पण करीत आहोत. या दानामुळे आमची पापातून मुक्तता कर. आम्हांला नवजीवन दान दे व सार्वकालिक जीवनाचे वरदान आम्हाला बहाल कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तू आम्हांला स्वर्गातून जीवनाची भाकर देतोस. या दिव्य भाकरीची आम्हांला नेहमी भूक लागू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

अस्सल ज्ञानाची ओढ ही खऱ्या खुऱ्या धार्मिक जीवनासाठी आवश्यक असते असे इस्राएली लोक मानीत. शलमोन हा यहुदी ज्ञानसाहित्याचा जनक मानला जाई. कुटुंब, राजदरबार आणि मंदिर ह्या ठिकाणांहून राजकीय, धार्मिक, सामाजिक व व्यावहारिक स्वरूपाचे शिक्षण दिले जाई. आजची वाचने मात्र त्याहीपुढे जाऊन आपल्याला ज्ञानाविषयी मार्गदर्शन करतात :

**अ) परमेश्वर हा सर्व ज्ञानाचा उगम आणि कळस आहे :** इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात होऊन गेलेला बेन सिरा नावाचा प्रज्ञावंत आजच्या पहिल्या वाचनात (सिराक १५:१५-२०) आपल्या शिष्यांना ज्ञानप्राप्तीसाठी पाचारण करतो. ज्ञान आणि मूर्खपणा ह्यांची तुलना जीवन आणि मरण ह्यांच्याशी करून परमेश्वर हाच ज्ञानाचा उगम असल्याने खरे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी व्यक्तीने नम्रपणे देवाकडे यावे असे तो सुचवितो.

**ब) माणसाने ईश्वरी ज्ञानाची उत्कंठा बाळगावी :** आजच्या दुसऱ्या वाचनात (१ करिंथ.२:६-१०) संत पॉल भौतिक स्वरूपाचे ज्ञान आणि ईश्वरी ज्ञान यामधील भेद दाखवून देतो. माणूस भौतिक ज्ञान मिळविण्यासाठी जेवढा झटतो, तेवढाच प्रयत्न जर त्याने ईश्वरी ज्ञान प्राप्त करण्यासाठी केला तर तो स्वर्गीय आनंद अनुभवू शकतो.

**क) ईश्वरी ज्ञान माणसाच्या अंत:करणात दडलेले आहे :** आजचे शुभवर्तमान (मत्तय ५:१७-३७) केवळ बाह्य नियम पाळण्यापेक्षा माणसाने आपल्या अंतरात्म्याचा कौल घेणे कसे आवश्यक आहे त्याविषयीचे ज्ञान आपल्यापुढे सादर करते.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात कुठल्या प्रकारचे ज्ञान कार्यरत आहे? भौतिक की ईश्वरी स्वरूपाचे? ईश्वरी स्वरूपाचे ज्ञान मिळविण्यासाठी मी काय केले पाहिजे?

●●●

| फेब्रुवारी २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १३ | सं कॅथरीन डी रिक्की (हि) | : उत्पत्ती ४:१-१५,२५/मार्क ८:११-१३ |
| मंगळ १४ | सं व्हॅलेंटाईन (हि) | : उत्पत्ती ६:५-८,७:१-५,१०/मार्क ८:१४-२१ |
| बुध १५ | सं फॉस्टिनस व ज्योविता (हि) | : उत्पत्ती ८:६-१३,२०-२२/मार्क ८:२२-२६ |
| गुरू १६ | सं ओनेसिमस (हि) | : उत्पत्ती ९:१-१३/मार्क ८:२७-३३ |
| शुक्र १७ | सेर्वाईट संस्थेचे सात पवित्र संस्थापक (हि) | : इब्री.११:१-१/मार्क ८:३४-९:१ |
| शनि १८ | सं सिमिअन (हि) | : इब्री.११:१-७/मार्क ९:२-१३ |